# यशोगाथा

## जिल्हा परिषद उस्मानाबाद

## कृषी विभाग

### राष्ट्रीय बॉयोगॅस व खात व्यवस्थापन कार्यक्रम

### २०१९-२०

# पंचायत समिती, भूम

**लाभधारकाचे नाव :- तात्यासाहेब जनार्धन खैरे**

**रा. आंतरगाव, ता. भूम**

**संयंत्राचा प्रकार :- दिनबंधू**

**संयंत्राचा आकार :- ३ घ.मी.**

**कुटुंबातील सदस्य संख्या : १० व्यक्ती**

**बायोगॅस संयंत्र घेण्यापुर्वीची स्थिती :-** बायोगॅस संयंत्र घेण्यापूर्वी आम्ही स्वयंपाकासाठी व इतर कामासाठी एल.पी.जी. गॅस सिलेंडर चा वापर करीत होतो. एखादे वेळेस वेळेवर गॅस सिलेंडर मिळेल नाही तर शेतातील झाडे तोडून सरपणासाठी वापर करीत होतो. धुरामुळे घरातील कपडे, भांडी, घराच्या भिंती काळ्या पडत होत्या. तसेच धुराचा त्रास देखील डोळ्यांना होत होता. शिवाय प्रदूषणाची हानी मोठ्या प्रमाणात होत होती.




**बायोगॅस संयंत्र घेतल्यानंतरची स्थिती :-** सन २०१९-२० अंतर्गत बायोगॅस संयंत्र बांधकाम करण्यासाठी पंचायत समिती येथे विहित नमुन्यातील अर्ज करून ३ घ.मी. आकाराचे बायोगॅस संयंत्र बांधकाम करण्यासाठी परवानगी मिळाल्यानंतर बायोगॅस संयंत्र बांधकामासाठी लागणारे सर्व आवश्यक असणारे साहित्य जमा करून घेतल्यानंतर विस्तार

अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित गवंडी कडून ३. घ.मी. आकाराचे बायोगॅस संयंत्राचे बांधकाम करून घेतले व नंतर २० दिवसांनी संयंत्रामध्ये शेन, पालापाचोळा व पाणी टाकून बायोगॅस शेन व पाण्याने भरून घेतल्यानंतर ८ दिवसांनी गॅस ची निर्मिती झाली. नंतर बाजारातून २ शेगड्या खरेदी करून २ कुटुंबासाठी गॅस कनेक्शन देवून वापर चालू करण्यात आलेला आहे. यापूर्वी आमच्या दोन कुटुंबांना महिन्याकाठी दोन गॅस सिलेंडर च्या टाक्या लागत होत्या. त्या आता बंद झाल्या असून महिन्याकाठी सरासरी १५०० रुपये आर्थिक बचत झालेली आहे. तसेच वेळेची पाणी बचत झालेली आहे.




सदर गॅस चे स्फोट होण्याची भीती नाही. वापरण्यास सोयीस्कर असून या पासून निघणारी सॅलरी उत्तम कंपोस्ट खात म्हणून शेतामध्ये वापरत आहे. त्यामुळे माझे शेतीचे उत्पन्नात निश्चितच वाढ होणार आहे.

सदर योजना अत्यंत चांगल्याप्रकारची आहे.

**तात्यासाहेब जनार्धन खैरे** | **गट विकास अधिकारी वर्ग-१**

**रा. आंतरगाव, ता. भूम** | **पंचायत समिती, भूम**